# बहुल संस्कृतीवाद : संकल्पना, उदय, विकास, समकालीन स्थिती, आव्हाने व उपाययोजना

**प्रा. डॉ. खंडेराव ज्ञानदेव खळदकर** राज्यशास्त्र विभागप्रमुख जयसिंगपूर कॉलेज,जयसिंगपूर ता. शिरोळ, जिल्हा-कोल्हापूर मो.8482989101 ई-मेल: kdkhaladkar1@gmail.com

---

**1) सारांश (Abstract):**

बहुल संस्कृतीवाद ही विविध सांस्कृतिक, धार्मिक, भाषिक आणि वांशिक गटांच्या सहअस्तित्वाची संकल्पना आहे .जी सामाजिक समावेशकता आणि सांस्कृतिक विविधतेचा स्वीकार करते.बहुल संस्कृतीवाद (Multiculturalism) ही संकल्पना आधुनिक लोकशाही व्यवस्थेत विविध भाषा, धर्म, वंश, जातीयता व सांस्कृतिक ओळखींच्या सहअस्तित्वाची तत्त्वज्ञानात्मक व राजकीय चौकट म्हणून विकसित झाली आहे. २०व्या शतकाच्या उत्तरार्धात विशेषतः कॅनडा, ऑस्ट्रेलिया, अमेरिका, आणि ब्रिटन सारख्या देशांत स्थलांतर आणि सांस्कृतिक विविधतेमुळे या विचारसरणीला संस्थात्मक स्वरूप प्राप्त झाले. विल किम्लिका, चार्ल्स टेलर आणि भिखू पारेख यांसारख्या विचारवंतांनी बहुल संस्कृतीवादाच्या तात्त्विक अधिष्ठानाला बळकटी दिली.भारतासारख्या बहुभाषिक, बहुधार्मिक देशात बहुल संस्कृतीवादाची संकल्पना घटनात्मक मूल्यांशी सुसंगत आहे. तथापि, ओळख-राजकारण, सामाजिक तणाव, स्थलांतर, धार्मिक मूलतत्त्ववाद आणि जागतिकीकरणाच्या परिणामांमुळे बहुल संस्कृतीवादासमोर विविध आव्हाने निर्माण झाली आहेत. प्रस्तुत संशोधन लेखात बहुल संस्कृतीवादाची संकल्पना, ऐतिहासिक पार्श्वभूमी, तिचा उदय (१९७० च्या दशकातील कॅनडा व युरोप), विकास (सांस्कृतिक बहुलवादापासून राजकीय धोरणांपर्यंत), समकालीन स्थिती (वैश्वीकरणातील आव्हाने), आव्हाने (सांस्कृतिक संघर्ष, एकीकरणाचा अभाव) आणि उपायोजना (शिक्षण, कायदेशीर सुधारणा) यांचे विश्लेषण केले आहे. प्रस्तुत लेख बहुल संस्कृतीवादाच्या प्रासंगिकतेवर भर देतो.

**2) प्रस्तावना (Introduction):**

मानवसमाज हा मूळतः विविधतेवर आधारित आहे. भाषा, धर्म, जात, वंश, परंपरा, जीवनशैली, मूल्यव्यवस्था आणि सांस्कृतिक प्रतीकांमधील भिन्नता ही मानवी समाजाची मूलभूत वैशिष्ट्ये आहेत. आधुनिक राष्ट्र-राज्य व्यवस्थेत, विशेषतः औद्योगिकीकरण, स्थलांतर, जागतिकीकरण व माहिती-तंत्रज्ञानाच्या क्रांतीनंतर, विविध संस्कृतींचा परस्पर संपर्क प्रचंड वाढलेला आहे. या पार्श्वभूमीवर "एक राष्ट्र, एक संस्कृती" या संकल्पनेऐवजी "अनेक संस्कृतींचे सहअस्तित्व" ही भूमिका महत्त्वाची ठरते. या भूमिकेचा वैचारिक व तत्त्वज्ञानात्मक पाया म्हणजे बहुल संस्कृतीवाद (Multiculturalism) होय.आधुनिक राष्ट्र-राज्याची रचना प्रामुख्याने एकसंध सांस्कृतिक ओळखीवर आधारित मानली जात असे; परंतु औद्योगिकीकरण, वसाहतवादोत्तर बदल, स्थलांतर आणि जागतिकीकरणामुळे समाज अधिकाधिक विविधतेकडे झुकले. परिणामी, "एक राष्ट्र, एक संस्कृती" या संकल्पनेऐवजी "एक राष्ट्र, अनेक संस्कृती" ही संकल्पना महत्त्वाची ठरली.बहुल संस्कृतीवाद ही केवळ सामाजिक वस्तुस्थिती नसून ती एक राजकीय व नैतिक तत्त्वज्ञान आहे, जी विविध सांस्कृतिक समूहांना मान्यता, सन्मान व अधिकार प्रदान करण्याचा पुरस्कार करते. चार्ल्स टेलर यांनी 'Politics of Recognition' या ग्रंथामधून सांस्कृतिक ओळखीच्या मान्यतेचे महत्त्व अधोरेखित केले, तर विल किम्लिका यांनी 'Multicultural Citizenship' या ग्रंथामध्ये अल्पसंख्याकांच्या सांस्कृतिक हक्कांची सैद्धांतिक मांडणी केली. भारतातील घटनात्मक तरतुदी भाषिक राज्यरचना, अल्पसंख्याकांनचे हक्क, अनुसूचित जाती-जमातींसाठी आरक्षण,या बहुल संस्कृतीवादाच्या मूल्यांशी अनुरूप आहेत.

बहुल संस्कृतीवाद ही केवळ सामाजिक वास्तवाची नोंद नाही, तर ती एक राजकीय, तत्त्वज्ञानात्मक व नैतिक संकल्पना आहे. ती विविध सांस्कृतिक ओळखींच्या समान सन्मानावर, समान हक्कांवर आणि सामाजिक न्यायावर भर देते. भारतासारख्या देशात, जिथे "विविधतेत एकता" हे राष्ट्रीय मूल्य मानले जाते, तेथे बहुल संस्कृतीवाद ही संकल्पना केवळ आयात केलेली नसून ऐतिहासिकदृष्ट्या रुजलेली आहे. तथापि, आजच्या काळात वाढते ध्रुवीकरण, असहिष्णुता, धार्मिक कट्टरता, राष्ट्रवादाची संकुचित व्याख्या आणि जागतिक स्तरावरील सांस्कृतिक संघर्ष यांमुळे बहुल संस्कृतीवादासमोर गंभीर आव्हाने उभी राहिली आहेत. प्रस्तुत संशोधन लेखात बहुल संस्कृतीवादाची संकल्पना, तिचा उदय व विकास, भारत व जगातील समकालीन स्थिती, त्यासमोरील प्रमुख आव्हाने व समस्या आणि त्यावरील संभाव्य उपाययोजना, शिफारसी यांचा सविस्तर, समीक्षात्मक अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**3) पारिभाषिक शब्द:**

1.बहुल संस्कृतीवाद (Multiculturalism): विविध सांस्कृतिक समूहांच्या सहअस्तित्वाला मान्यता देणारी तत्त्वज्ञानात्मक व राजकीय संकल्पना. (विविध सांस्कृतिक गटांच्या अस्तित्वाला मान्यता देणारी आणि त्यांना समान हक्क देणारी सामाजिक-राजकीय धोरणे व अभिवृत्ती होय.)

2.सांस्कृतिक बहुलता (Cultural Pluralism):समाजात विविध संस्कृतींचे सहजीवन. दुसऱ्या शब्दात विविध संस्कृतींना एकमेकांपासून स्वतंत्र राहू देणारी व्यवस्था, ज्यात विलया ऐवजी सहअस्तित्वावर भर दिला जातो .

3.ओळख-राजकारण (Identity Politics):विशिष्ट सामाजिक किंवा सांस्कृतिक गटाच्या हितसंबंधांवर आधारित राजकारण.

4.समाकलन (Integration) :विविध गटांना मुख्य प्रवाहात सामावून घेण्याची प्रक्रिया.

5.बहुसंख्याकवाद (Majoritarianism):बहुसंख्याक गटाच्या मूल्यांना प्राधान्य देणारी राजकीय भूमिका.

6. Laïcité (लैसिटे): राज्याची धर्मनिरपेक्षता व सार्वजनिक जीवनात धर्मापासून तटस्थता. म्हणजे राज्य आणि धर्म यांना पूर्णपणे वेगळे ठेवण्याचे तत्त्व. फ्रेंच राज्यव्यवस्थेतील Laïcité या तत्त्वाचा मराठीत साधारण अर्थ “धर्मनिरपेक्षता” किंवा “धर्म आणि राज्य यांची पूर्ण विभक्तता” असा होतो.

7.विविधता व्यवस्थापन (Diversity Management): सांस्कृतिक मतभेदांना सामाजिक सद्भावासाठी नियोजितपणे हाताळणे.

वरील पारिभाषिक शब्दांचे स्पष्टीकरण संकल्पनेच्या मूलभूत आकलनासाठी आवश्यक आहे.

**4) उद्दिष्टे:**

सदर संशोधन लेखाची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत-

1.बहुल संस्कृतीवाद या संकल्पनेचा तात्त्विक अर्थ स्पष्ट करणे.

2. बहुल संस्कृतीवादाच्या संकल्पनेचा ऐतिहासिक व तात्त्विक अभ्यास करणे.

3. बहुल संस्कृतीवादाच्या उदयामागील ऐतिहासिक व सामाजिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.
(बहुल संस्कृतीवादाच्या उदय आणि विकासाचा इतिहास उलगडणे.)

4.जागतिक पातळीवरील व भारतातील बहुल संस्कृतीवादाची परंपरा व समकालीन स्थिती समजून घेणे , विश्लेषण करणे.

5. बहुल संस्कृतीवादासमोरील प्रमुख आव्हाने व समस्या ओळखणे आणि त्या आव्हानांवर संभाव्य उपाययोजना सुचवणे.

**5) गृहीतके:**

1.बहुल संस्कृतीवाद लोकशाही व्यवस्थेला अधिक समावेशक बनवतो.

2.सांस्कृतिक मान्यता सामाजिक सलोखा वाढवते.

3. बहुल संस्कृतीवाद सामाजिक सद्भाव वाढवतो, परंतु अपरिहार्य आव्हाने निर्माण करतो.

4.वैश्वीकरणाने तिची समकालीन स्थिती गुंतागुंतीची केली आहे.

5.योग्य धोरणांच्या अभावामुळे बहुल संस्कृतीवादात तणाव निर्माण होऊ शकतो.यापार्श्वभूमीवर योग्य धोरणांद्वारे आव्हाने सोडवता येतील

**6) विषय विवेचन:**

6.1. **बहुल संस्कृतीवाद : संकल्पना व अर्थ :(बहुल संस्कृतीवाद : संकल्पनात्मक मांडणी)**

बहुल संस्कृतीवाद ही संकल्पना प्रामुख्याने राजकीय तत्त्वज्ञान, समाजशास्त्र आणि सांस्कृतिक अभ्यासाशी संबंधित आहे. “बहुल संस्कृतीवाद” म्हणजे एका समाजात किंवा राष्ट्रात अस्तित्वात असलेल्या विविध सांस्कृतिक समूहांना स्वतंत्र ओळख, सन्मान व समान अधिकार देण्याची तत्त्वज्ञानात्मक व राजकीय भूमिका होय.” बहुल संस्कृतीवाद म्हणजे एका समाजात विविध भाषा, धर्म, जातीय गट, परंपरा व जीवनपद्धती यांचे समतोल सहअस्तित्व मान्य करणे आणि त्या विविधतेला सांस्कृतिक, सामाजिक व राजकीय मान्यता देणे. “एकच संस्कृती,एक राष्ट्र” या कल्पनेऐवजी विविधतेत एकता ही भूमिका बहुल संस्कृतीवाद मांडतो.

विल किम्लिका (Will Kymlicka) यांच्या मते, बहुल संस्कृतीवाद म्हणजे अल्पसंख्याक सांस्कृतिक गटांना त्यांच्या ओळखीचे संरक्षण व विकासासाठी विशेष हक्क देण्याची लोकशाही संकल्पना होय. (Kymlicka 10).विल

किमलिका (Will Kymlicka) यांच्या मते, बहुल संस्कृतीवाद म्हणजे केवळ सहनशीलता नव्हे, तर अल्पसंख्याक व वंचित समूहांच्या सांस्कृतिक हक्कांचे संरक्षण होय (Kymlicka 31) चार्ल्स टेलर यांच्या “Politics of Recognition” या सिद्धांतानुसार, व्यक्ती व समूहांच्या ओळखीची सामाजिक मान्यता न मिळाल्यास त्यांचे अस्तित्वच संकटात येते. त्यामुळे बहुल संस्कृतीवाद हा केवळ सहिष्णुतेचा नव्हे, तर ओळखीच्या मान्यतेचे राजकारण आहे. (Taylor 25)

**6.2. बहुल संस्कृतीवाद पुढील मूलभूत तत्त्वांवर आधारलेला आहे :**

विविधतेचा स्वीकार,समान नागरिकत्व व समान हक्क, भेदभावविरोधी भूमिका,सांस्कृतिक ओळखींचा सन्मान.चार्ल्स टेलर (Charles Taylor) यांच्या “Politics of Recognition” या संकल्पनेनुसार, सांस्कृतिक ओळखींची मान्यता नाकारली गेल्यास सामाजिक अन्याय निर्माण होतो (Taylor 25).

**6.3. बहुल संस्कृतीवादाचा उदय:**

बहुल संस्कृतीवादाचा उदय प्रामुख्याने दुसऱ्या महायुद्धानंतर विशेषतः१९६०-७० च्या दशकात पाश्चात्त्य देशांत झाला. युरोप व उत्तर अमेरिकेत वसाहतवादोत्तर स्थलांतरामुळे विविध वांशिक व सांस्कृतिक समुदाय एकत्र आले. स्थलांतरितांच्या वाढत्या संख्येमुळे सांस्कृतिक विविधतेचे व्यवस्थापन हा प्रश्न निर्माण झाला. कॅनडा, अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि ब्रिटन या देशांनी बहुल संस्कृतीवादाला धोरणात्मक मान्यता दिली.कॅनडाने 1971 मध्ये अधिकृतपणे बहुसांस्कृतिक (बहुल संस्कृती) धोरण स्वीकारले. यामागील प्रमुख हेतू म्हणजे फ्रेंच, इंग्लिश व मूळ आदिवासी संस्कृतींसह स्थलांतरित समुदायांना समान हक्क देणे आहे. विल किमलिका यांनी ‘Multicultural Citizenship’ या ग्रंथामध्ये अल्पसंख्याकांच्या समूहाधिकारांची मांडणी केली. भिखू पारेख यांनी ‘Rethinking Multiculturalism’ या ग्रंथामधून सांस्कृतिक संवादाचे महत्त्व अधोरेखित केले.

आज जागतिक पातळीवर अनेक देशांनी स्थलांतर धोरणांत बहुसांस्कृतिक तत्त्वांचा स्वीकार केला असल्याचे दिसून येते. कॅनडा, ऑस्ट्रेलिया,फ्रान्स , ब्रिटन, अमेरिका आणि काही युरोपीय देशांमध्ये बहुल संस्कृतीवाद वेगवेगळ्या स्वरूपात आढळतो. कॅनडामध्ये तो यशस्वी मानला जातो, तर फ्रान्ससारख्या देशात “सांस्कृतिक समाकलन (Assimilation)” वर भर दिला जातो.

बहुल संस्कृतीवादाचा उदय प्रामुख्याने दुसऱ्या महायुद्धानंतर झाला. यामागील प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे-

**1)औद्योगिकीकरण:**

युरोपमध्ये (इंग्लंड) औद्योगिक क्रांतीनंतर उद्योगधंद्यांच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली. देशांतर्गत बाजारपेठेंच्या गरजेपेक्षा जास्त उत्पादित झालेले उत्पादन खपवण्यासाठी औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या देशांची नजर अविकसित व मागासलेल्या देशांच्या बाजारपेठावर पडली.या देशातील बाजारपेठावर कब्जा मिळवण्यासाठी झालेल्या स्पर्धेतून वसाहतवाद व महायुद्धाचा जन्म झाला . दुसऱ्या महायुद्धानंतर राजकीय, आर्थिक व अन्य कारणामुळे तिसऱ्या जगातील राष्ट्रांना वसाहतवादातून मुक्त करणे युरोपियन राष्ट्रांना भाग पडले . राजकीय वर्चस्वाचा अंत झालेला असला तरी आर्थिक कारणांसाठी एकमेकांवर अवलंबून राहणे विकसित आणि अविकसित राष्ट्रांसाठी क्रमप्राप्त होते. आर्थिक कारणामुळे एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रांसी सहकार्य करू लागले. व्यापार, तंत्रज्ञानाचे आदानप्रदान, मनुष्यबळ आदान प्रदान, भांडवलाचे आवागमन आणि रोजगार इत्यादी कारणामुळे एका देशातील नागरिक दुसऱ्या देशात वास्तव्यासाठी जाऊ लागले . एक समान अर्थव्यवस्थेच्या अंतर्गत विविध सांस्कृतिक समूह कार्य करू लागले.विभिन्न सांस्कृतिक समुदायातील लोक देशात वास्तव्य करू लागल्यामुळे सांस्कृतिक विभिन्नता निर्माण होऊ लागली. विविध देशातून आलेल्या सांस्कृतिक समुदायातील लोक आपल्या संस्कृतीला देशाच्या मौलिक संस्कृतीच्या समान समजू लागले. आपल्या सांस्कृतिक अस्तित्वाला राष्ट्राच्या मौलिक संस्कृतीने मान्यता प्रधान करून बरोबरीचा व समानतेचा दर्जा द्यावा यासाठी प्रयत्न करू लागले. त्यातून बहुसंस्कृतीवादाच्या उदयाला पोषक पार्श्वभूमी निर्माण झाली.(पाटील. 2019, पृष्ठ .322) थोडक्यात, औद्योगिकीकरण, व्यापार, स्थलांतर, तंत्रज्ञानाचा विकास, मनुष्यबळ व भांडवलाचे आदानप्रदान, रोजगार व दुसऱ्या महायुद्धानंतर वसाहतवादाच्या ऱ्हासानंतर अविकसित राष्ट्रांमधून विकसित राष्ट्रांमध्ये विविध कारणांमुळे झालेले स्थलांतर इत्यादी बाबींमुळे बहुसंस्कृतीवादाच्या उदयाला पोषक वातावरण निर्माण झाले.

**2)वसाहतवादी व्यवस्थेचा ऱ्हास:**

दुसऱ्या महायुद्धानंतर वसाहतवादी शासन व्यवस्थांचा,राजवटींचा अंत झाल्यानंतर आशिया व आफ्रिकेतील नवस्वतंत्र राष्ट्रांमध्ये सांस्कृतिक पुनरुत्थानाला चालना मिळाली.

**3) स्थलांतर :**

औधोगीकीकरण, व्यापार,युद्ध ,देशांतर्गत वांशिक ,धार्मिक ,सांस्कृतिक संघर्ष ,जागतिकीकरण,स्थलांतर आणि विज्ञान व तंत्रज्ञानाचा विकास,रोजगार आदी,विविध कारणांमुळे युरोप, अमेरिका, कॅनडा व ऑस्ट्रेलियामध्ये आशिया, आफ्रिका व लॅटिन अमेरिकेतून मोठ्या प्रमाणावर लोक स्थलांतरीत झाले .

**4) मानवी हक्क चळवळी :**

दुसऱ्या महायुद्धानंतर विविध कारणांमुळे एका देशातून दुसऱ्या देशात स्थलांतर झाल्यांमुळे एकच संस्कृती,एक राष्ट्र" या कल्पनेऐवजी विविधतेत एकता या तत्वाला महत्व प्राप्त झाले. स्थलांतरित झालेल्या देशतील शासन व्यवस्थांनी बहुल संस्कृतीवादाचे अधिकृत धोरण म्हणून स्वीकारले. उदा.कॅनडा,ऑस्ट्रेलिया व काही युरोपीयन राष्ट्र. कालांतराने यादेशात वांशिक ,धार्मिक व सांस्कृतिक कारणांवरून बहुसंख्यांक व अल्पसंख्यांक यांच्यात तीव्र संघर्ष निर्माण झाले.बहुसंख्यांकांकडून अल्पसंख्याकांना दुय्यम वागणूक देण्यात येऊ लागली.परिणामी मुलभूत मानवी हक्कांच्या संरक्षण व संवर्धनासाठी यादेशांत वांशिक भेदभावविरोधी नागरिक हक्क चळवळी निर्माण झाल्या.संयुक्त राष्ट्र संघाच्या मानवी हक्क संघटनेकडून याबाबतीत सकारात्मक हस्तक्षेपाचे धोरण अवलंबिल्यामुळे काही प्रमाणात अल्पसंख्याकांच्या हक्कंचे संरक्षण व संवर्धन होण्यास मदत झाली.तथापि, अल्पसंख्याकांच्या हक्कांचे अनेक प्रश्न अध्यापही अनुउत्तरीत आहेत.

**5) लोकशाही शासन व्यवस्था** :

बहुल संस्कृतीवादाच्या विकासला लोकशाहीचा उदय हे एक महत्वाचे कारण मानले जाते. लोकशाही शासन व्यवस्थेत समता, स्वातंत्र्य व न्याय या मूल्यांवर भर दिला जातो.लोकशाही अधिकारशाहीच्या विरोधी आणि समानतेला महत्व देणारी शासनप्रणाली आहे.या शासन व्यवस्थेत विविध सांस्कृतिक समूहांना समान मानले जाते.समानतेच्या आधारावर कोणत्याही सांस्कृतिक समुदायांबरोबर भेदभाव होणार नाही याची काळजी घेतली जाते.उदा.भारत, कॅनडा आदी देश. लोकशाही शासन व्यवस्था स्तलांतरित समुदाय आणि वंचित समुदायासोबत कोणत्याही प्रकारच्या भेदभावाला विरोध करते.तसेच या समुदायावर कोणत्याही प्रकारची सांस्कृतिक मूल्य लादली जाणार नाहीत याची हमी देत असते.(पाटील2019,पृष्ठ.322)त्यामुळे लोकशाही शासनप्रणाली बहुल संस्कृतीवादाच्या विकासला पूरक मानली जाते. लोकशाही व्यवस्था असलेल्या देशात अल्पसंख्यांक समूहांना सर्व क्षेत्रांमध्ये सहभागी होण्याचा, बहुसंख्यांकांच्या बरोबरीने समान संधी देण्याचा प्रयंत्न केला जातो .

**6) उदारमतवादी शासन व्यवस्था :**

दुसऱ्या महायुद्धानंतर जगातील बहुसंख्य देशांनी उदारवादी शासन व्यवस्थेचा स्वीकार केला.ही शासन व्यवस्था समानता आणि स्वातंत्र्यावर आधारित आहे. स्थलांतरीत आणि वंचित समुदायांनी उदारवादी राजकीय व्यावास्थांकडून सांस्कृतिक समानतेची अपेक्षा केली जाते.कारण या समुदायांनी राज्यातील बहुसंख्यांक समुदायाच्या वर्चस्वाला विरोध केला. उदारवादी शासन व्यवस्थेत विभिन्न सांस्कृतिक समूहांच्या अस्तित्वाला व स्वातंत्र्याला मान्यता दिली जाते.म्हणुन याप्रकारच्या शासन व्यवस्थेत सांस्कृतिक एकात्मतेऐवजी सांस्कृतिक बहुलतेला बळ प्राप्त झाले. (पाटील. 2019,पृष्ठ.323). एकंदरीत, दुसऱ्या महायुद्धानंतर उदारवादी शासन व्यवस्थेच्या उदयामुळे बहुसंस्कृतीवादाला व्यापक स्वरुपात मान्यता मिळू लागली.१९७० नंतर कॅनडाने बहुल संस्कृतीवाद अधिकृत धोरण म्हणून स्वीकारले. पुढे ऑस्ट्रेलिया व काही युरोपीय राष्ट्रांनीही या दिशेने धोरणात्मक पावले उचलली.

**7) जागतिकीकरण:**

जागतिकीकरण ही विभिन्न प्रकारच्या प्रादेशिक व क्षेत्रीय प्रतिबंधापासून मुक्ती देणारी आणि विश्व - समाजाची कल्पना करणारी संकल्पना आहे. जागतिकीकरणामुळे विश्वातील विभिन्न संस्कृतींना एक - दुसऱ्याला समजून घेण्याची संधी मिळाली. या विचारधारेमुळे स्थानिक संस्कृतींना विश्वाच्या विविध भागातील निर्मिती मूल्य, विचार, उत्पादने, सांस्कृतिक चिन्हे व विश्वासाशी परिचय होऊ लागला. एका सांस्कृतिक समुदायाचा दुसऱ्या सांस्कृतिक समुदायाशी संपर्क होऊ लागला. या परस्परसंपर्कातून सांस्कृतिक समुदायात वैचारिक देवाण-घेवाणीचा प्रारंभ झाला. विभिन्न समुदायांच्या आदानप्रदानातून सांस्कृतिक सुधारणेला चालना मिळाली. आपल्या समुदयातील अमानवी परंपरा व कालविसंगत गोष्टींमध्ये बदल करण्यास

सुरुवात झाली. त्यासोबत प्रत्येक सांस्कृतिक समुदायात भयाची भावना देखील विकसित होऊ लागली.इतर समुदायांचे सांस्कृतिक वर्चस्व वाढू नये वा त्यांच्या मूल्यांचा प्रभाव आपल्या सांस्कृतिक समुदायातील व्यक्तींवर पडू नये ,म्हणून समुदायातील व्यक्तींमध्ये सांस्कृतिक ओळख कायम टिकून राहील यासाठी प्रयत्न सुरू झाले. विकासापासून वंचित असलेल्या बहिष्कृत सांस्कृतिक समुदायांनी (उदा.निग्रो, अल्पसंख्यांक, हीन वर्ग,समलैंगिक समुदाय इत्यादी) देखील आपली सांस्कृतिक ओळख टिकवण्यासाठी प्रभावशाली संस्कृतीशी संघर्ष करण्यास प्रारंभ केला. (पाटील. 2019 पृष्ठ. 323)त्यामुळे जागतिकीकरण ही संकल्पना बहुसंस्कृतीवादाच्या निर्मितीसाठी कारणीभूत ठरली असे म्हणता येईल.

वरीलप्रमाणे बहुसंस्कृतीवादाच्या उदयाच्या प्रमुख कारणांची सविस्तर चर्चा करण्यात आली आहे.

**6.4. बहुसंस्कृतीवादाची तत्त्वे व लक्षणे** :

बहुसंस्कृतीवादाची तत्त्वे व लक्षणे पुढील प्रमाणे सांगता येतील . सांस्कृतिक ओळख व अस्तित्वाला महत्त्व, अल्पसंख्यांकांच्या अधिकारांचे समर्थन, सांस्कृतिक सापेक्षतेला विरोध, सांस्कृतिक एकीकरणाला विरोध, सांस्कृतिक विविधता व बहुलतेला महत्व,सांस्कृतिक विचार विनिमयाला प्राधान्य, सांस्कृतिक समानतेचे समर्थन, राष्ट्रनिर्माण प्रक्रियेला महत्त्व.इत्यादी बहुल संस्कृतीवादाची लक्षणे दिसून येतात.

**6.5. बहुल संस्कृतीवादाचा विकास:** (Development)

बहुल संस्कृतीवादाचा विकास सांस्कृतिक बहुलवादापासून (१९ व्या शतकातील हॉरेश रॅडन) राजकीय धोरणांपर्यंत झाला. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात अमेरिकेत ई.बी. डु बॉईस यांनी सांस्कृतिक बहुलवादाची संकल्पना मांडली. २० व्या शतकात ती लोकशाही मूल्यांशी जोडली गेली, ज्यात अल्पसंख्याक हक्कांचा समावेश झाला. भारतात संविधानातील अनुसूचित क्षेत्रे व भाषा धोरणे हे प्रारंभिक स्वरूप दर्शवतात. जागतिकीकरणाने त्याला वैश्वीकस्वरूप प्राप्त झाले.

१९७०-९० च्या काळात बहुल संस्कृतीवादाचा सैद्धांतिक व धोरणात्मक विकास झाला.जागतिक पातळीवर सर्वप्रथम कॅनडा (१९७१) ने बहुल संस्कृतीवाद अधिकृत धोरण म्हणून स्वीकारला.याशिवाय कॅनडाने सर्वसमावेशक शैक्षणिक व सांस्कृतिक धोरण स्वीकारून सर्व सांस्कृतिक समूहांना मातृभाषा शिक्षण, सांस्कृतिक सणांची मान्यता, प्रतिनिधित्व दिले.बहुल संस्कृतीवादाच्या विकासात तत्त्वज्ञांचे योगदान देखील महत्वाचे आहे.यामध्ये प्रामुख्याने चार्ल्स टेलर यांनी व्यक्ती व समूहांच्या ओळखीची सामाजिक मान्यता (Recognition) यांवर भर दिला. विल किम्लिका यांनी अल्पसंख्याक व वंचित समूहांच्या सांस्कृतिक हक्कांच्या संरक्षणाला महत्व दिले.भारतासारख्या देशांत घटनात्मक धर्मनिरपेक्षता, भाषिक-धार्मिक विविधतेची मान्यता ही बहुल संस्कृतीवादाची भारतीय आवृत्ती मानली जाते.

**बहुल संस्कृतीवादाच्या विकासाचे तीन टप्पे ओळखता येतात :**

1) सहनशीलतेचा टप्पा – विविधतेला केवळ सहन करणे.

2) मान्यतेचा टप्पा – सांस्कृतिक ओळखींची अधिकृत मान्यता.

3) हक्काधारित टप्पा – भाषिक, धार्मिक व सांस्कृतिक हक्कांचे संरक्षण.

या टप्प्यांदरम्यान बहुल संस्कृतीवादाने केवळ सांस्कृतिक प्रश्नांपुरते मर्यादित न राहता, राजकीय प्रतिनिधित्व, शिक्षण, रोजगार व कायदे यांपर्यंत विस्तार केला आहे .

**6.7. जागतिक पातळीवरील बहुल संस्कृतीवादाची समकालीन स्थिती**:

जागतिकीकरणामुळे बहुल संस्कृतीवाद अधिक व्यापक झाला आहे. तथापि,अलीकडच्या काळात दहशतवाद, धार्मिक मूलतत्त्ववाद आणि स्थलांतरविरोधी भावना यामुळे काही देशांत बहुल संस्कृतीवादावर पुनर्विचार सुरू झाला आहे.उदा.अमेरिका,इंग्लंड ,ऑस्ट्रेलिया इत्यादी . तर फ्रान्स सारख्या देशांत 'धर्मनिरपेक्ष समाकलन' (assimilationist model) प्राधान्याने स्वीकारले गेले आहे.वर्तमानकाळात अमेरिका,युरोपमध्ये वाढता इस्लामोफोबिया, निर्वासितांचा प्रश्न आणि उजव्या राष्ट्रवादाचा उदय यांमुळे बहुल संस्कृतीवादावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.अलीकडच्या काळात अनेक देशांत बहुल संस्कृतीवादाच्या विरोधात प्रतिक्रिया उमटताना दिसतात. यासंदर्भात पुढील मुद्द्यांचे थोडक्यात विश्लेषण असे करता येईल:

**1) युरोपमध्ये निर्वासित संकट:**

युरोपमध्ये विशेषतः European migrant crisis नंतर बहुल संस्कृतीवादावर मोठी चर्चा सुरू झाली. मध्यपूर्व आणि आफ्रिकेतील युद्ध, राजकीय अस्थिरता आणि आर्थिक संकटांमुळे मोठ्या प्रमाणावर निर्वासित युरोपमध्ये आले. या परिस्थितीत विविध धर्म, भाषा आणि संस्कृती असलेल्या लोकांचे एकत्र सहअस्तित्व कसे राखायचे हा प्रश्न निर्माण झाला. काही देशांनी मानवतावादी दृष्टिकोन स्वीकारून निर्वासितांना आश्रय दिला, तर काही ठिकाणी स्थानिक लोकसंख्येमध्ये सांस्कृतिक असुरक्षिततेची भावना वाढली. त्यामुळे बहुल संस्कृतीवादाच्या धोरणांवर टीका होऊ लागली आणि सामाजिक एकात्मता टिकवण्याचे आव्हान निर्माण झाले.थोडक्यात,सुरवातीच्याकाळात निर्वासितासंबंधी उदारमतवादी दृष्टीकोनातून युरोपियान देशांनी बहुल संस्कृतीवादाचे धोरण स्वीकारले.मात्र,कालांतराने हेच धोरण युरोपमध्ये संकट बनून उभा राहताना दिसून येत आहे . आज युरोपियान देशांमध्ये या धोरणा विरोधात विविध स्वरूपाच्या हिंसक व तीव्र प्रतिक्रिया उमटताना दिसतात.

**2) अमेरिकेत वंशवाद व ओळख राजकारण:**

अमेरिकेत बहुलसंस्कृतीवादाचा संबंध वंश, जातीयता आणि सांस्कृतिक ओळख यांच्याशी घट्ट जोडलेला आहे. विशेषतः Black Lives Matter movement या चळवळीमुळे वंशभेद आणि सामाजिक न्यायाचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला. विविध वांशिक आणि सांस्कृतिक गटांनी आपली ओळख, हक्क आणि प्रतिनिधित्व यासाठी राजकीय स्तरावर आवाज उठवला. यामुळे "ओळख राजकारण" (Identity Politics) अधिक बळकट झाले. काहींच्या मते हे बहुल संस्कृतीवादाचे सकारात्मक रूप आहे. कारण ते विविधतेला मान्यता देते; तर इतरांच्या मते यामुळे समाजात विभाजन वाढण्याची शक्यता असते.

**3) फ्रान्समध्ये सांस्कृतिक एकात्मतेचा आग्रह:**

फ्रान्समध्ये बहुल संस्कृतीवादाऐवजी सांस्कृतिक एकात्मतेवर (Assimilation) अधिक भर दिला जातो. फ्रेंच राज्यव्यवस्थेत Laïcité या तत्त्वाला मोठे महत्त्व आहे, ज्यामध्ये सार्वजनिक क्षेत्रात धर्मनिरपेक्षता आणि एकसंध राष्ट्रीय ओळख टिकवण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे धार्मिक किंवा सांस्कृतिक भिन्नता सार्वजनिक जीवनात प्रदर्शित करण्यावर काही निर्बंध घालण्यात आले आहेत (उदा. सरकारी संस्था, शाळांमध्ये धार्मिक चिन्हांवर बंदी). फ्रान्सच्या मते राष्ट्रीय एकात्मता टिकवण्यासाठी समान नागरिकत्वाची भावना महत्त्वाची आहे; परंतु या धोरणामुळे काही अल्पसंख्याक गटांमध्ये आपली सांस्कृतिक ओळख दडपली जात असल्याची भावना निर्माण होते.

फ्रेंच राज्यव्यवस्थेतील Laïcité या तत्त्वाचा मराठीत साधारण अर्थ "धर्मनिरपेक्षता" किंवा "धर्म आणि राज्य यांची पूर्ण विभक्तता" असा होतो.थोडक्यात,Laïcité (लैसिटे) म्हणजे राज्य आणि धर्म यांना पूर्णपणे वेगळे ठेवण्याचे तत्त्व. या तत्त्वानुसार राज्य कोणत्याही धर्माला प्राधान्य देत नाही.सर्व नागरिकांना धर्मस्वातंत्र्य दिले जाते.तसेच सार्वजनिक क्षेत्रात (विशेषतः सरकारी संस्था, शाळा) धार्मिक प्रभाव मर्यादित ठेवला जातो.सोप्या शब्दांत Laïcité म्हणजे राज्याची धर्मनिरपेक्षता + सार्वजनिक जीवनात धर्मापासून तटस्थता.म्हणजेच फ्रान्समध्ये राष्ट्रीय एकात्मता टिकवण्यासाठी नागरिकांची ओळख धर्माऐवजी "फ्रेंच नागरिक" म्हणून समान मानली जाते.

थोडक्यात,वरील उदाहरणांवरून असे दिसून येते की बहुल संस्कृतीवाद हा जगभरात एकसारखा स्वीकारला गेलेला नाही. काही समाज विविधतेला प्रोत्साहन देतात, तर काही समाज राष्ट्रीय एकात्मतेला प्राधान्य देतात. त्यामुळे बहुल संस्कृतीवाद हा सतत बदलणारा आणि वादग्रस्त राजकीय-सामाजिक मुद्दा राहिला आहे.सॅम्युएल हंटिंग्टन यांच्या "Clash ofCivilizations" या सिद्धांतानुसार, सांस्कृतिक संघर्ष हे भविष्यातील जागतिक राजकारणाचे केंद्र ठरणार आहेत. (Huntington 45) एकंदर,समकालीन जागतिक स्थिती पाहता सॅम्युएल हंटिंग्टन यांचे विचार प्रस्तुत ठरतात. २०२६ पर्यंत बहुल संस्कृतीवाद संकल्पना वैश्वीकरण, स्थलांतर व डिजिटल माध्यमांमुळे मजबूत झाली, परंतु पॉप्युलिझम (ट्रम्प यांच्या अमेरिका, युरोपियन डावे पक्ष) मुळे ती आव्हानात्मक बनली आहे. भारतात सीएए-एनआरसी(CAA-NRC) वादाने तिची चाचणी घेतली, तर युरोपात फ्रान्ससारख्या देशांत 'सेक्युलरिझम' विरुद्ध संघर्ष आहे. कोविडनंतरची स्थलांतर वाढीने ती अधिक प्रासंगिक झाली आहे .

**भारतामधील बहुल संस्कृतीवाद:**

भारत हा जगातील सर्वात मोठा बहुसांस्कृतिक देश मानला जातो. तसेच भारत देश हा जगातील सर्वात प्राचीन बहुसांस्कृतिक समाजांपैकी एक आहे. विविध धर्म, भाषा, जातीय समूह व परंपरा येथे सहअस्तित्वात आहेत. या अनुषंगाने

भारतातील ऐतिहासिक परंपराचा विचार करता ती समृद्ध असलेली दिसते.जसे की ,वैदिक काळातील सहिष्णु धार्मिक दृष्टिकोन,बौद्ध व जैन परंपरेतील अहिंसा व समता तत्व,भक्ति व सूफी चळवळीतील सांस्कृतिक समन्वय,अकबराचा "दीन-ए-इलाही" प्रयोग,आदी.आधुनिक काळात भारतीय संविधानातील तरतुदी बहुल संस्कृतीवादाचा पाया घालतात. भारतीय संविधानाने धर्मनिरपेक्षता(Secularism), भाषिक स्वातंत्र्य आणि सांस्कृतिक हक्क यांना मान्यता दिली आहे. याला घटनात्मक आधार आहे. उदा.भारतीय राज्यघटनेतील कलम-२५ ते २८ : धार्मिक स्वातंत्र्य, कलम २९ व ३० अल्पसंख्याकांना सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क प्रदान करतात. भाषावार प्रांतरचना, आरक्षण धोरणे व पंचायतराज व्यवस्थेत विविध गटांचा सहभाग ही बहुल संस्कृतीवादाची व्यावहारिक उदाहरणे आहेत.

थोडक्यात,आज भारतीय संघराज्यात शेकडो भाषा, अनेक धर्म, विविध जातीय समूह आणि प्रादेशिक संस्कृती एकत्रितपणे नांदतात. सहिष्णुतेची परंपरा,संवाद व समन्वय, "विविधतेत एकता" ही भारतीय बहुल संस्कृतीवादाची वैशिष्ट्ये आहेत. तथापि, जातीयवाद, धार्मिक ध्रुवीकरण, भाषिकवाद, प्रादेशिक व उपप्रादेशिक अस्मिता,आर्थिक विषमता आणि राजकीय हस्तक्षेप यांमुळे भारतीय बहुल संस्कृतीवाद आज आव्हानांच्या टप्प्यावर उभा आहे.या आव्हानांना आज सामोरे जावे लागत आहे.

**7.बहुल संस्कृतीवादासमोरील आव्हाने व समस्या:**

**1. सांस्कृतिक संघर्ष (Cultural Conflict):**

पाश्चात्य देशात स्थलांतर व जागतिकीकरण यामुळे सांस्कृतिक संघर्ष निर्माण होताना दिसून येत आहे. येथे बहुसंख्यांकांचा सांस्कृतिक वर्चस्ववाद निर्माण होताना दिसून येतो. विविध धर्म, भाषा व परंपरा असलेल्या गटांमध्ये मूल्ये व जीवनशैलीतील फरकामुळे कधीकधी संघर्ष निर्माण होतो. त्यामुळे सामाजिक सलोखा राखणे कठीण होते. अलिकडच्या काळात अनेक देशात धार्मिक व सांस्कृतिक संघर्ष तीव्र बनल्याचे दिसतात.असे संघर्ष धार्मिक अतिरेक (ईस्लामोफोबिया, हिंदुत्ववाद)सामाजिक व सांस्कृतिक एकीकरण रोखतात.उदा.भारत ,अमेरिका,इंग्लंड व युरोपियन देश.

**2. राष्ट्रीय ओळख व एकात्मतेचे संकट:**

देशात अनेक संस्कृतींना मान्यता दिल्यामुळे काही वेळा एकसंध राष्ट्रीय ओळख कमकुवत होण्याची भीती व्यक्त केली जाते. त्यामुळे राष्ट्रवाद व बहुल संस्कृतीवाद यांच्यात तणाव निर्माण होऊ शकतो.उदा.युरोपियन देश

**3. सामाजिक विभाजन (Social Fragmentation):**

काही वेळा विविध सांस्कृतिक गट आपापल्या समुदायापुरते मर्यादित राहतात. त्यामुळे समाजात गटांमध्ये अंतर वाढते आणि एकात्मतेला धक्का बसतो.

**4. वंशवाद व भेदभाव:**

विविध सांस्कृतिक गटांबाबत पूर्वग्रह, वंशवाद किंवा धार्मिक व जातीय असहिष्णुता दिसून येते. त्यामुळे समानतेच्या तत्त्वाला बाधा येते. समाज्यात ताणताणाव निर्माण होऊन तीव्र नकारात्मक प्रतिक्रिया उमटतात. धर्मांधता व कट्टरता वाढताना दिसते. धार्मिक मूलतत्त्ववाद मुळे परस्पर अविश्वास वाढतो.उदा.भारत ,अमेरिका,इंग्लंड ,ऑस्ट्रोलिया व अन्य युरोपियन देश आदी.

**5. स्थलांतर व निर्वासितांचा प्रश्न:**

युद्ध ,दुष्काळ ,उपलब्ध रोजगारांच्या संधी यामुळे लोक मोठ्या प्रमाणावर एका देशातून दुसऱ्या देशात स्थलांतर करतात किंवा निर्वासित होतात .परिणामी स्थानिक संसाधने, रोजगार आणि सामाजिक समतोल यावर मोठा तान वा दबाव निर्माण होतो.यातूनच संबंधित देशात आर्थिक ,राजकीय,धार्मिक व सांस्कृतिक संघर्ष निर्माण होऊन बहुल संस्कृतीवादाच्या तत्वाला आव्हान मिळताना दिसून येते.उदा.अमेरिका,इंग्लंड ,ऑस्ट्रोलिया व अन्य युरोपियन देश आदी.

**6. एकीकरणाचा अभाव:**

स्थलांतरीत किंवा निर्वासित समूहांकडून संबंधित देशात 'पॅरलल सोसायटीज' निर्माण केल्या जातात.उदा. ब्रिटनमधील मुस्लिम वस्त्या.यामुळे राष्ट्रीय एकात्मतेविषयी मूळनिवासी समूहामध्ये भीती निर्माण होऊन तीव्र नकारात्मक प्रतिक्रिया उमटतात .परिणामी स्थलांतरित अल्पसंख्यांक समूह व मूळनिवासी बहुसंख्यांक समूह यांच्यात एकीकरणाचा अभाव जाणवतो.

**7. राजकीय ध्रुवीकरण:**

सामाजिक,धार्मिक,सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रातील लोकप्रिय नेते (PopulistLeader) बहुलवादाला 'खतरनाक' म्हणतात. परिणामी धार्मिक ,सांस्कृतिक व राजकीय ध्रुवीकरण होऊन अल्पसंख्यांक विरुद्ध बहुसंख्याकवादाचा उदय होतो.

**8. आर्थिक असमानता:**

अल्पसंख्याकांना दुय्यम दर्जा मिळतो.भारतात, भाषिक-धार्मिक दंगे ही प्रमुख उदाहरणे आहेत. उद्योगधंदे , रोजगार धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय,आर्थिक आदी सर्व क्षेत्रात अल्पसंख्याकांना असमान वागणूक दिली जात असल्याचे जाणवते.परिणामी दोन्ही समूहात ताणतणाव,संघर्ष निर्माण होताना दिसत आहेत.

अशाप्रकारे वरील समस्यांचा सविस्तर अभ्यास केल्यानंतर असे म्हणता येईल की, या समस्यांमुळे बहुल संस्कृतीवाद कधी कधी समाजात फूट पाडणारा घटक ठरतो.

**8. बहुल संस्कृतीवादावरील उपाययोजना:** .

बहुल संस्कृतीवादासमोरील आव्हानांवर संभाव्य उपाययोजना पुढीलप्रमाणे -

1. सहिष्णुता व परस्पर आदर वाढवणे:

समाजात विविध संस्कृतींबद्दल आदर, सहिष्णुता व संवाद वाढवणे आवश्यक आहे. यामुळे सांस्कृतिक संघर्ष कमी होऊ शकतो. घटनात्मक मूल्यांची बळकटी विकसित करून समाजात समता ,धर्मनिरपेक्षता व धार्मिक - सांस्कृतिक सहिष्णुता वाढीस लावणे.

2. शिक्षणाद्वारे जागरूकता(समावेशक शिक्षणव्यवस्था):

शिक्षण व्यवस्थेत बहुसांस्कृतिक मूल्ये, मानवाधिकार व लोकशाही तत्त्वांचा समावेश करून विद्यार्थ्यांमध्ये समावेशक दृष्टीकोन विकसित करणे. शिक्षण सुधारणा करून बहुसांस्कृतिक अभ्यासक्रम राबवणे, समावेशक शिक्षणव्यवस्था निर्माण करून विविधतेबद्दल सकारात्मक दृष्टिकोन विकसित करणे.उदा.जसे कॅनडामध्ये शिक्षणात विविध संस्कृती ,भाषा आणि आदिवासी परंपरांचा समावेश केला जातो.अनेक प्रांतांमध्ये इंग्रजी -फ्रेंच सोबत आदिवासी भाषांचे शिक्षण दिले जाते.भारतात विविध भाषा ,धर्म आणि संस्कृती लक्ष्यात घेऊन बहुभाषिक अभ्यासक्रम तयार केला आहे .शालेय शिक्षणात संविधानिक मुल्ये,सांस्कृतिक विविधता,सहिष्णुता आणि राष्ट्रीय एकात्मता यांवर भर दिला जातो.भारतात 22 पेक्षा अधिक भाषांमध्ये शिक्षणाची व्यवस्था उपलब्ध आहे. थोडक्यात,बहुसांस्कृतिक समाज असलेल्या देशांनी शिक्षण व्यवस्थेत विविध भाषा ,संस्कृती आणि समुदायांच्या परंपरांचा समावेश करून समावेशक व बहुसांस्कृतिक अभ्यासक्रम विकसित केले आहेत. कॅनडा,भारत,इंग्लंड ,ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड ही त्याची प्रमुख उदाहरणे मानली जातात.

**3. समान नागरिकत्व व कायदेशीर संरक्षण:**

सर्व नागरिकांना समान हक्क व संधी देणारी धोरणे राबवणे आणि अल्पसंख्याकांच्या हक्कांचे कायदेशीर संरक्षण करणे.

**4. सामाजिक समावेशन धोरणे (Social Inclusive Policies):**

अल्पसंख्याकांचा संस्थात्मक सहभाग वाढवणे.विविध सांस्कृतिक गटांना शिक्षण, रोजगार व राजकीय सहभागात समान संधी देऊन त्यांचे प्रतिनिधित्व देऊन समाजात समावेशकता वाढवणे.उदा.भारतातील आरक्षण धोरण.

**5. संवाद व सांस्कृतिक देवाणघेवाण:**

संवाद व सांस्कृतिक आदानप्रदानाच्या माध्यमातून परस्पर समज वाढवणे.सामुदायिक कार्यक्रमांच्या माध्यमातून सांस्कृतिक उत्सव व संवाद सत्रे आयोजित करणे .विविध समुदायांमध्ये संवाद, सांस्कृतिक कार्यक्रम व सहकार्य वाढवून परस्पर समज वाढवणे. उदा.देशांतर्गत अंतर विध्यापिठीय,अंतर महाविध्यालयीन क्रीडा व सांस्कृतिक मोहत्सस्वांचे आयोजन करणे. यामुळे परस्पर संवाद व सांस्कृतिक देवाणघेवाण होण्यास मदत होईल.

**6.कायदेशीर चौकट:**

बहुल संस्कृतीवादाच्या तत्वाला आव्हान देणाऱ्या ,सामाजिक व राष्ट्रीय एकात्मतेला बाधा निर्माण करणारे नकारात्मक वक्तव्य, भाषण अथवा लिखान यावर कायदेशीर बंदी घालणे.हेट स्पीच सारखे कठोर कायदे करणे व सकारात्मक भेदभावाचे धोरण अवलंबिणे आवश्यक आहे. संतुलित धोरणनिर्मिती करून समूहाधिकार व राष्ट्रीय एकात्मता यामध्ये समतोल साधने.

अशाप्रकारे वरीलप्रमाणे बहुल संस्कृतीवादासमोरील आव्हाने,समस्या व उपाययोजना याविषयी चर्चा केल्यानंतर असे म्हणता येईल की,बहुल संस्कृतीवादामुळे समाजात विविधता व समृद्धी वाढते; परंतु त्याचबरोबर सामाजिक समन्वय व एकात्मता राखण्याचे आव्हानही निर्माण होते. योग्य धोरणे, शिक्षण आणि सहिष्णुतेच्या मूल्यांद्वारे या आव्हानांवर प्रभावीपणे मात करता येऊ शकते.

**9) निष्कर्ष (Conclusion):**

बहुल संस्कृतीवाद ही आधुनिक लोकशाही समाज व्यवस्थेची अपरिहार्य गरज आहे. विविधतेला नाकारणे म्हणजे मानवी समाजाच्या वास्तवाला नाकारणे होय. विविधतेचा सन्मान राखत सामाजिक एकात्मता प्रस्थापित करणे ही बहुल संस्कृतीवादाची मूलभूत भूमिका आहे. योग्य धोरणे, शिक्षण आणि संवाद यांच्या साहाय्याने बहुल संस्कृतीवाद समाजात स्थैर्य व समावेशकता निर्माण करू शकतो. बहुल संस्कृतीवाद ही जागतिक समाजाची गरज असली तरी तिचे आव्हाने गंभीर आहेत. उदयापासून विकासापर्यंत तिने सांस्कृतिक समृद्धी आणली, परंतु समकालीन स्थितीत ध्रुवीकरण वाढले आहे. योग्य उपायांद्वारे ती सद्भावाचे साधन ठरू शकते. भारतासारख्या देशात बहुल संस्कृतीवाद ही संकल्पना ऐतिहासिक वारसा आहे; मात्र तिचे संवर्धन करण्यासाठी घटनात्मक मूल्यांची प्रामाणिक अंमलबजावणी आवश्यक आहे. भारतासारख्या देशात बहुल संस्कृतीवाद हा केवळ धोरण नसून जीवनपद्धती आहे. तथापि, समकालीन सामाजिक-राजकीय आव्हानांच्या पार्श्वभूमीवर बहुल संस्कृतीवादाचे पुनर्वाचन व पुनर्स्थापन होणे आवश्यक आहे. जागतिक पातळीवर बहुल संस्कृतीवादासमोरील आव्हाने गंभीर असली, तरी संवाद, सहिष्णुता व न्यायाधारित धोरणांद्वारे ती पार करता येऊ शकतात. बहुल संस्कृतीवादाचा यशस्वी अवलंब म्हणजे विविधतेतील मतभेद नष्ट करणे नव्हे, तर त्यांना लोकशाही मार्गाने एकत्र नांदण्याची कला विकसित करणे होय. थोडक्यात,समानता, सन्मान आणि सहअस्तित्व या मूल्यांवर आधारित बहुल संस्कृतीवादच शाश्वत व शांततामय समाजनिर्मितीचा मार्ग दाखवू शकतो.

**10) शिफारसी:**

1.शासकीय धोरणांमध्ये बहुलवाद अनिवार्य करणे .

2.शालेय व विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात बहुसांस्कृतिक मूल्यांचा समावेश करणे.

3.अल्पसंख्याक हक्कांच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र आयोगांची कार्यक्षमता वाढवणे.

4 .माध्यमांद्वारे सांस्कृतिक सलोखा प्रोत्साहित करणे.

5 .स्थानिक पातळीवर सांस्कृतिक संवाद मंच स्थापन करणे.

6 . सामाजिक संवाद वाढवण्यासाठी NGO चा योग्य वापर करणे.

7 .संशोधन व धोरणनिर्मितीत बहुसांस्कृतिक दृष्टिकोन अंगीकारणे. संशोधनासाठी तुलनात्मक अभ्यासास (उदा.भारत-कॅनडा) प्रोत्साहन देणे.

**संदर्भसूची (References):**

**इंग्रजी संदर्भ ग्रंथ :**

1.Huntington, Samuel P. The Clash of Civilizations and the Remaking of World Order. Simon & Schuster, 1996.

2.Kymlicka, Will. Multicultural Citizenship: A Liberal Theory of Minority Rights. Oxford UP, 1995.

3.Parekh, Bhikhu. Rethinking Multiculturalism: Cultural Diversity and Political Theory. Palgrave Macmillan, Harvard University Press, 2000.

4.Sen, Amartya. Identity and Violence. Penguin Books, 2006.

5.Taylor, Charles. "The Politics of Recognition." Multiculturalism: Examining the Politics of Recognition, edited by Amy Gutmann, Princeton UP, 1994, pp. 25–73.

6.Modood, Tariq. Multiculturalism. Polity Press, 2007.

7.Indian Constitution. Government of India, 1950.

**मराठी संदर्भ ग्रंथ:**

1) पाटील महेंद्र ( 2019),आधुनिक राजकीय विचारप्रणाली, डायमंड पब्लिकेशन्स ,पुणे.

2) सुमंत यशवंत (2018), विचारसरणीच्या विश्वात युनिक अकॅडमी पब्लिकेशन्स प्रा.ली., पुणे.

3) चौसाळकर अशोक (2017), आधुनिक राजकीय सिद्धांत ,युनिक अकॅडमी पब्लिकेशन्स प्रा.ली. पुणे.

4)"बहुसंस्कृतिवाद."विकिपीडिया,Wikimedia Foundation,9Nov.2010,hi.wikipedia.org/wiki/ बहुसंस्कृतिवाद.